# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- ३३/२०२५ दिनांक- २५/०१/२०२५

## प्रेस नोट

दिनांक २४/०१/२०२५ रोजी ३५ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे अनुषंगाने वाहतुक शाखा वसई परिमंडळ २ मि.भा.व.वि. तर्फे मा. मधुकर पाण्डेय (भा.पो.से.) पोलीस आयुक्त मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय ,मा. दत्तात्रय शिंदे (भा.पो.से) अप्पर पोलीस आयुक्त ,मा. सुहास बावचे (म.पो.से) पोलीस उप आयुक्त मुख्यालय, मा.शंकर इंदलकर (म.पो.से) सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक यांचे मार्गदर्शनाखाली नालासोपारा पुर्व भागातील के.एम.पी.डी. हायस्कुल, नालासोपारा पुर्व परीसरातील सेंट विलब्रॉड व सेंट ॲन्थोनी स्कुल येथे सदर रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत लांगी वाहतुक शाखा, वसई, पोलीस उप निरिक्षक/ महेबुब रियाज तडवी व वाहतुक शाखेचे अंमलदार यांनी शाळेचे विदयार्थी, शिक्षक वर्ग यांना वाहतुकीचे नियम, रस्त्यांवर होणारे अपघात टाळणेकरिता शाळेत जाताना-येताना घ्यावयाची काळजी, स्कुलमध्ये येणे-जाणे करिता असलेले शाळेची बस अथवा खाजगी वाहन यांनी मुलांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी याबद्दल सुचना व मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच रिक्षा चालक व पादचारी यांना वाहतुकीचे नियमांचे पालन करणेबाबत चौकसभा घेवुन त्यांना मार्गदर्शन करुन पत्रके वाटप करण्यात आले.

के.एम.पी.डी. हायस्कुल, नालासोपारा पुर्व येथे मार्गदर्शन करतांना वपोनि/प्रशांत लांगी व वाहतुक शाखेचे अंमलदार








नालासोपारा पुर्व परीसरातील सेंट विलब्रॉड व सेंट ॲन्थोनी स्कुल येथे मार्गदर्शन करतांना पोलीस उप निनिक्षक/ महेबुब रियाज तडवी व वाहतुक शाखेचे अंमलदार








------0000------